**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व)
ता. वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० २५२५१०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@gmail.com

जा.क्र. : व.वि.श.म./निवडणूक/११५६/२०१९-२०
दिनांक : १०/०१/२०२०

## जाहीर दरपत्रक सुचना

सर्व संबंधित शहरातील स्टुडियो धारक, कला व सामाजिक संस्था यांना सदर जाहिर पत्रक सुचनेव्दारे सुचित करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका दि.२६ जानेवारी २०२० ते दि.१० फेब्रुवारी २०२० या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करावयाचा आहे. सदर कालावधीत लोकशाही निवडणूक व सुशासन "जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार !" या थिम व या विषयावर झिंगल मराठी, हिंदी या भाषेत खालील तक्यात नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहून पुरवठा करावयाचा आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्रती झिंगल व शॉर्ट फिल्म सर्व करांसहित दर |
|---|---|---|
| १ | वसई-विरार शहर महानगपालिका क्षेत्रात दि.२६ जानेवारी २०२० ते दि.१० फेब्रुवारी २०२० या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करावयाचा आहे या संदर्भात लोकशाही निवडणूक व सुशासन "जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार !" या थिम व या विषयावर रेल्वेस्टेशन, बस डेपो, सोशल मिडिया, रेडियो, शहरातील प्रमुख चित्रपट गृहे या माध्यमांतून मराठी, हिंदी या भाषेत या विषयावर झिंगल व शॉर्ट फिल्म तयार करून पुरवठा करणे. | |

अटी व शर्ती

१) पुरवठादाराने चित्रीकरणाचा अनुभव असल्यास नमुद करावा त्या संबंधीचे दस्तावेज जोडावे.
२) सदर कामासाठी आगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही..
३) सदर साहित्यासाठी पुरवठ्याचा दर, आपले लेटर हेड नमुद करून बंद लिफाफयामध्ये दि.१८/०१/२०२० रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत मुख्यालय येथील आवक जावक विभागात सादर करावयाचे आहे.
४) प्राप्त दरपत्रक दि.१८/०१/२०२० रोजी सायं ४:०० वा.उघडण्यात येतील.
५) मालकाचे /संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावी.
६) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्याचा /नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.
७)वरील अटीचे पालन जो पुरवठादार करणार नाही त्याचे दरपत्रक तपासणी अंती अपात्र ठरविण्यात येईल.
८) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून रु.१००/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा लिहून देण्याचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
९) फक्त पत्र निविदाकारांनी सादर केलेल्या किंमतीच्या दरपत्र विचारात घेण्यात येतील आणि खरेदीचा निर्णय L१ च्या आधारे घेण्यात येतील.
१०) झिंगलची Script पुरवठा दाराने/ठेकेदाराने संबंधित विभागाकडून मंजूर करून घेणे आवश्यक आहे.
११) झिंगल अंतीम करण्याआधी संबंधित विभागाकडून त्याचा अभिप्राय घ्यावा त्या अभिप्रायांची माहिती झिंगलमध्ये अंतर्भाव करण्यात यावा.
१२) झिंगल बनविताना कुठल्याही व्यक्तीचे Copy Right / Trademark इत्यादी उल्लंघन होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठा दारांनी/ठेकेदाराची राहील व तसे झाल्यास ठेकेदार सदरच्या कारवाईस पात्र ठरेल.

सही/-
(डॉ.किशोर गवस)
उपायुक्त तथा नोडल अधिकारी, निवडणूक
वसई-विरार शहर महानगरपालिका